राज्य आरोग्य व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय, पुणे-१

डॉ. जी. पी. परदेशी
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : crs_d83@yahoo.com
डॉ.नायडू रुग्णालय आवार,केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/जमृनों/आदेश निर्गमित करणे/8248-8286/१०, दिनांक :- 8 जुलै २०१०

प्रति,
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा दंडाधिकारी,
जिल्हा............(सर्व)

विषय :- जन्म व मृत्यु नोंदणी संदर्भात आदेश निर्गमित करण्याबाबत...

जन्म - मृत्यु नोंदणी जर घटना घडल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उपलटून गेल्यानंतर करावयाची असल्यास, कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांच्या आदेशांची आवश्यकता असते. नमूद आदेश निर्गमित करण्याबाबत अनेक शंका तहसिलदार कार्यालयाकडून या कार्यालयाकडे विचारण्यात येतात. केंद्रिय जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम २००० मधील तरतुदीनुसार आपल्या कार्यालयांतर्गत कार्यरत असणाऱ्या तहसिलदारांना खाली नमूद मुद्दयानुसार जन्म - मृत्यु नोंदणी संदर्भातील आदेश जारी करावेत ही विनंती.

१) महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार उशिरा जन्म मृत्यु नोंदणी बाबत घटना घडल्याच्या दिनांकानंतर १ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यावर कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने निबंधक, उशिरा जन्म आणि मृत्यूच्या घटनेची नोंद करीत असतो.

सदर नोंदणी करताना, काही घटना ४० किंवा ५० वर्षापूर्वी घडून गेलेल्या असतात. अशा घटनांबाबत आदेश निर्गमित करावे किंवा कसे? या बाबत तहसिलदार कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात येतो. अशा प्रकरणात तहसिलदार संबंधित व्यक्तिकडून सदर घटनेबाबत ठोस पुराव्याची मागणी करु शकतो जर सादर केलेले पुराव्याच्या वैधतेबाबत कोणतीही शंका आल्यास, संबंधित घटनेची नोंद करण्याबाबत ठामपणे नकार देऊ शकतो. **परंतु केवळ सदर घटनेस बराच कालावधी उलटून गेलेला असल्यामुळे आदेश निर्गमित करता येऊ शकत नाही.**

Magistrate

**अशी सबब देऊन आदेश देण्याबाबत नकार देता येणार नाही. उशिरा नोंदणी बाबत आदेश देण्यासाठी कायद्याने कोणताही कालावधी निश्चित केलेला नाही.**

सदर उशिरा नोंदणी संदर्भातील आदेश जारी करण्यापूर्वी संबंधितांकडून ना उपलब्धता दाखला नमुना क्र. १० घेणे आवश्यक आहे. सदर ना उपलब्धता दाखला, निबंधक कार्यालयाकडून संबंधितांनी प्राप्त करणे आवश्यक आहे.

२) दत्तक प्रकरणात नातेवाईक किंवा मित्राकडून दत्तक घेण्यात आलेल्या बालकांचे जन्म प्रमाणपत्र अगोदरच अस्तित्वात असतात. अशा प्रकरणामध्ये सदर जन्म नोंदीमध्ये दत्तक आईवडिलांचे नाव समाविष्ट करुन नव्याने जन्म प्रमाणपत्र अदा करण्याचा प्रश्न उपस्थित होतो, अशा वेळेस जन्म नोंद वहीत/प्रमाणपत्रात दत्तक आईवडिलांचे नाव समाविष्ट करण्यास मान्यता देणारे न्यायालयीन आदेश काढले जातात. सदर आदेशामध्ये दत्तक आईवडिलांचे नाव व दत्तक जाणारे बालकाचे स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच सदर बालकाच्या प्रमाणपत्रात बदल करण्याबाबत संबंधित निबंधकाला स्पष्ट सूचना आवश्यक आहेत.

३) ज्यावेळी एखादया संस्थेकडून बालक दत्तक दिले जाते त्यावेळी संबंधित न्यायालयाकडून दत्तक विधानाबाबत आदेश निघताना सदर आदेशात जन्माचा दिनांक, ठिकाण, दत्तक आई दत्तक वडिलांचे नाव या बाबत स्पष्ट आदेश संबधित निबंधकास प्राप्त झाल्यास, निबंधक त्यानुसार, संबंधित नोंदीमध्ये शेरा रकान्यात नोंद घेऊन नव्याने जन्म प्रमाणपत्र अदा करणे सोयीचे होईल. या करिता दंडाधिकारी यांनी दत्तक प्रकरणात आदेश निर्गमित करताना वरील बाबींचा प्रामुख्याने समावेश होईल असे पहावे.

४) हरविलेल्या व्यक्तिची मृत्यूनोंद करण्याकरता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असते. मृत्यु नोंदणी करण्याकरिता मृत्यु दिनांक व ठिकाण यांची माहिती आवश्यक आहे. **न्यायालयाने दिवाणी मृत घोषित करताना सदर आदेशात मृत्यूदिनांक व ठिकाण नमूद करणे आवश्यक आहे.** निबंधक कार्यालयास प्राप्त झालेल्या बऱ्याच आदेशात मृत्यूदिनांक व ठिकाण नमूद न केल्यामुळे मृत्युनोंद करणे अश्यक्य होत आहे. त्यामुळे हरविलेल्या व्यक्तिची मृत्यूनोंद होताना वरील बाबींची खबरदारी आदेश निर्गमित करताना घेण्यात यावी.

५) बऱ्याच वेळा प्राप्त पुराव्यानुसार तहसिलदार जन्म मृत्यु घटनेच्या उशिरा नोंदीबाबत आदेश निर्गमित करतात. सदर आदेश निर्गमित होण्यापूर्वी जर इतर व्यक्तिंनी सदर आदेश जारी करणेबाबत आक्षेप अथवा हरकती नोंदविल्या तर, तहसिलदार सदर बाबीची चौकशी करुन माहिती व पुराव्याच्या आधारे आदेश जारी करु शकतो अथवा नाकारु शकतो. परंतु एकदा आदेश जारी झालेनंतर इतर व्यक्तिंनी आक्षेप घेतला तर सदर प्रकरण संबधित निबंधकाकडे वर्ग करण्यात यावे. संबंधित निबंधक जन्म मृत्यु यांच्याकडे जर सदर नोंद खोटी आहे या बाबतचे पुरावे सादर करण्यात आले तर निबंधक त्या बाबतची खात्री करुन घेऊन केंद्रिय जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम २५ नुसार आपला अहवाल आपले वरिष्ठ कार्यालय (ग्रामीण भागासाठी गटविकास अधिकारी/शहरी विभागासाठी आरोग्य अधिकारी/मुख्याधिकारी) यांना सादर करेल. व त्याचे म्हणणे ऐकूण घेतल्यावर या बाबत आवश्यक ती कारवाई करेल. यामध्ये कलम ११(६) नुसार नियमाखाली दुरुस्त अथवा रद्द केलेली प्रत्येक नोंदीची माहिती कलम ८ व ९ नुसार माहिती देणाऱ्या व्यक्तिस त्याच्या घरच्या कायमच्या पत्यावर पाठविण्यात येईल.

वर नमूद केलेली माहिती ही तहसिलदारांना जन्म मृत्यु उशिरा नोंदणी प्रकरणात तसेच हरविलेल्या व्यक्तिची नोंद व दत्तक प्रकरणातील जन्म नोंदीबाबतचे आदेश निर्गमित करण्यास उपयुक्त असून आपल्या जिल्हयातील सर्व तहसिलदारांना उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी ही विनंती.

7/7/010

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत उचित कार्यवाहीसाठी :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु,
जिल्हा परिषद..............(सर्व)

प्रत सादर :- १) मा. संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३) मा. सचिव, महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

Magistrate

दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी, तालुका/भाग जिल्हा................यांचे समोरील कामकाज.

श्री/श्रीमती..............................राहणार.............................ता.......................
यांचा दिनांक ......................चा अर्ज.

संदर्भ :- पहा (१) जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चा कलम १३(३)
(२) महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३)
(३) निबंधक जन्म-मृत्यु, ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका/कॅन्टोन्मेंट.....यांचा सदर जन्म/मृत्यु नोंदविला नसल्याबद्दल /नोंदवहया उपलब्ध नसल्याचा इत्यादीचा दाखला १० (अ)/१० (ब) दिनांक
(४) अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र दिनांक
(५) अर्जदाराचे सदर घटनेबाबतचे पुरावे
(६) अर्जदाराचा अर्ज दिनांक

**आदेश**

क्रमांक दिनांक
दंडाधिकारी/उपविभागीय
दंडाधिकारी............
तालुका/भाग...........जिल्हा.........
यांचे कार्यालय,.......................
दिनांक :-

ज्या अर्थी माझे असे निदर्शनास आले आहे की, ........................................ यांचा /हिचा जन्म/मृत्यु मौजे....................ता.....................जिल्हा...................... येथे दिनांक ...............रोजी झाला आहे. आणि त्याच्या/तिच्या जन्माची/मृत्यूची/नोंद जन्म/मृत्यु रजिस्टरमध्ये नसल्याचा/रजिस्टर उपलब्ध नसल्याचा दाखला नमुना क्र १०अ/१०ब मध्ये संबंधित गावाचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी तथा निबंधक, जन्म व भृत्यु, ग्रामपंचायत.............गटविकास अधिकारी, पंचायत समिती ............मुख्याधिकारी/वैद्यकिय अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, नगर परिषद............ यांनी दिलेला आहे व ....................................याचा/हिचा जन्मदिनांक.....................रोजी झालेले प्रतिज्ञापत्र त्याचे तिचे आई/वडिल/इतर नातेवाईक......... ......................यांनी केलेली आहे.

तसेच जन्म/मृत्यूची घटना सदर दिनांकास व नमूद ठिकाणी झाली असल्याबाबतचे शासकिय पुरावे संबंधितांनी सादर केलेले असून त्याची वैधता या कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत तपासून घेतलेली असून त्या बाबत माझी खात्री झालेली आहे.

-२-

त्या अर्थी मी श्री/श्रीमती........................दंडाधिकारी उपविभागीय दंडाधिकारी तालुका/भाग..................................जिल्हा.................. जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३), महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असा आदेश देतो/देते की,.............................. याचा/हिचा जन्म/मृत्यु ची नोंद संबंधित निबंधक जन्म मृत्यु, ग्रामपंचायत/नगरपरिषद ............यांनी आजचे तारखेस करावी. नोंदणीसाठी लागणारी सविस्तर माहिती व विलब शुल्क रु. १०/- संबंधित अर्जदाराकडून घ्यावी.

हा आदेश आज दिनांक.....................रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

(गोल शिक्का)

ठिकाण :-

तारीख :-

दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी
............तालुका/भाग जिल्हा......

प्रति,
आरोग्य अधिकारी/मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म मृत्यु महानगरपालिका/नगरपरिषद............ जिल्हा.........कॅन्टोन्मेंट कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट .................जिल्हा ............ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु ग्रामपंचायत............तालुका.............जिल्हा....

दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी
...........तालुका/भाग जिल्हा......

प्रतिलिपी माहितीसाठी :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती ................जिल्हा..................